दैनिक साम्ययोग--

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पं.

अंक : ११६ ) वर्धा, शुक्रवार ता. ३१ जुलई १९६४ (मूल्य ५ न.पं.

## लोकतांत्रिक समाजवाद सर्वोदय समाजाच्या आदर्शांच्या निकटतम

–जयप्रकाश नारायण

श्री. जयप्रकाश नारायण ह्यांनी मदुऱ्याला लोकतांत्रिक समाजवाद विषयावर भाषण करीत असतांना सांगितले की सर्वोदय समाजाचे आदर्शांच्या सिद्धिसाठी दुसऱ्या कोणत्याहि राज्य व्यवस्थेपेक्षा लोकतांत्रिक समाजवादी राज्य हे सर्वांत अधिक सहायक होऊ शकेल.

कारण 'लोकतांत्रिक समाजवादी राज्य सर्वोदय आंदोलनाच्या राजनैतिक, आर्थिक आणि सामाजिक आदर्शांच्या निकटतम आहे.'



बुनियादी दृष्टीने पाहता समाजवाद व सर्वोदयाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोण समसमान आहे. कारण पाश्चिमात्य लोक समजतात की 'समाजवाद सामाजिक संघटनेतील केवळ अेक राजनैतिक किंवा आर्थिक व्यवस्था मात्र नसून ती अेक जीवन पद्धति आहे.

मी सर्वोदय आंदोलनाला, लोकतांत्रिक समाजवादी आंदोलनाचें अेक पूरक आंदोलन समजतो. कारण आजच्या परिस्थितीत अेका राजकीय संघटनेची सरकार आणि संसदेमध्ये आवश्यकता आहे असे मला वाटते.

मार्क्सवाद्यांशी आमचा मतभेद येथेच आहे की जर आपण शेवटी शासन संस्थेचे विलयन मान्य करता तर मग हुकुमशाही राजवटीची स्थापना करू नका. शासनमुक्त समाज बनविण्याच्या मार्गातील ती अेक मोठी धोंड ठरेल. साम्यवाद हिंसेद्वारा कायम केला जातो आणि त्यामुळे हुकुमशाही तंत्र त्यांना अपरिहार्य ठरते. साम्यवादी आंदोलन हे अल्पसंख्यांकांचे आंदोलन आहे. गांधीजींचे अनुयायी किंवा सर्वोदय आंदोलन चालविणाऱ्या लोकांचेहि मत आहे की अंतिम व्यवस्थेत शासन संस्थां गळून पडावी. त्यासाठी ग्रामीण पातळीवर अेका विकसित संपूर्ण स्वराज्याचा नमुना आम्ही उभा करू इच्छितो. आणि असे नमुने अधिक संख्येत ठिकठिकाणी उभे होऊन समाजाच्या प्राथमिक स्तरावर अेक शासनमुक्त समाजाचे चित्र निर्माण करावे अशी आमची इच्छा आहे.

सर्वोदयाच्या अनेक कार्यक्रमापैकी हा एक कार्यक्रम आहे. त्या सर्वांचा उद्देश्य शासनाचे स्तोम व व्याप्ती क्रमशः कमी करण्याचा आहे. ह्या आदर्शाला गाठण्यासाठी अन्य कोणत्याहि शासन प्रणालीपेक्षा लोकतांत्रिक समाजवादी राज्य हे अधिक अनुकूल क्षेत्र आहे.

लोकतांत्रिक समाजवादाद्वारे केवळ राजनैतिक मूल्यांचेच नव्हे तर नैतिक व आध्यात्मिक मूल्यांना पण महत्व देण्यात यावे. समाजवादी मानव निर्माण होण्यासाठी व्यक्तीने स्वेच्छेने आपल्या संपत्तीचा हिस्सा आपल्या शेजाऱ्यांना देण्यासाठी तयार असले पाहिजे. तरच त्याला आपल्या जीवनात समाजवाद उतरविता येईल. सर्वोदय आंदोलनाचे ह्याच दिशेने प्रयत्न चालले आहेत.

---०---

## वर्धा जिल्ह्यातील सर्व ग्रामदानी गावात दोन ऑक्टोबर पर्यंत खादीकार्य चालू करण्याचा शुभ संकल्प

नागविदर्भ चरखा संघ, महिला समिति, खादी कमिशन इ. खादी संस्थांद्वारा वर्धा जिल्ह्यातील सर्वंच ग्रामदानी गावात खादीकार्य सुरू करण्याचा निर्णय ह्या संस्थांनी घेतला आहे.

पाच सात गावात विणाईचे कार्याला प्रत्यक्ष सुरुवात करून तेथे दोन अक्टोबर पर्यंत १ हजार वर्ग गज कापड विणण्याचा त्यांचा निश्चय आहे. आज भिवापूर ह्या एकाच ग्रामदानी गावात विणाईची व्यवस्था आहे आणि सोरटा गावात अंबरचें केंद्र चालू आहे.

### गांधी जन्म शताब्दी पर्यंत

## गुजराथ प्रांतात ग्रामस्वराज्याची स्थापना करण्याचे ध्येय

राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यांच्या जन्म शताब्दी पर्यंत गुजराथ प्रदेशात ग्रामस्वराज्याची स्थापना करावी ह्या हेतूने गांधीजींनी स्थापन केलेल्या अहमदाबाद येथील साबरमती आश्रमात बैठक झाली.

ही बैठक गुजरात सर्वोदय मंडळाने बोलाविली होती. ग्रामस्वराज्य स्थापन होण्यासाठी ग्रामदान, शांतिसेना आणि ग्रामाभिमुख खादी ह्या त्रिविध कार्यक्रमाला सफल करण्यासाठी त्याला गतिशील कसे करावे ह्या बाबतीत ह्या बैठकीत चर्चा झाली. ह्या बैठकीत भाग घेण्यासाठी गुजरात प्रांताचे सुविख्यात कार्यकर्ते श्री. रविशंकर महाराज, श्री. बबलभाई मेहता, श्री. जुगतराम भाई दवे, डॉ. द्वारकादासजी जोशी, राज्याचे ग्रामविकास मंत्री श्री. वजुभाई शाह, कृषिमंत्री श्री. उत्सवभाई परीख, इत्यादिनी ह्या बैठकीत भाग घेतला. ह्या कार्याला वेग देण्यासाठी रचनात्मक कार्यकर्त्यांचे संघटन करावे म्हणून श्री. जुगतरामभाई दवे ह्यांच्या अध्यक्षतेखाली अेक समिति बनली.

त्यानंतर राज्यातील निरनिराळ्या जिल्ह्यात ग्रामदान व खादीला चालना देण्यासाठी विचार विनिमय या बैठकीत झाला. जेथे जेथे ग्रामदानाचे काम जोर पकडेल तेथें तेथे वेळ देण्याचे आश्वासन श्री. बबलभाई मेहता ह्यांनी दिले. आणि पंचायत राज्याचे मंत्री श्री. वजुभाई शाह ह्यांनी रचनात्मक कार्यांत ज्या काही व्यावहारिक अडचणी येतील त्या दूर करण्यासाठी सरकारी पातळीवरूनहि आपण संपूर्ण मदत करू असे त्यांनी आश्वासन दिले.

गुजरात प्रांतात आतापर्यंत दोनशे गावांचे ग्रामदान झाले. परंतु त्यासाठी आवश्यक तो कायदा किंवा सरकारी व अन्य क्षेत्रात बरीच अस्पष्टता असल्यामुळे ह्या कार्यांत बाधा पडत आहे. त्यासाठी गुजरात सरकारला अेक ग्रामदान कायद्याचा नमूना कसा असावा ह्यासंबंधी अेक नमुन्याचे बिल सादर करण्यात आलेले आहे. त्यासंबंधी स्पष्टीकरण करतांना कृषिमंत्री श्री. उत्सवभाई परीख म्हणाले की अन्य प्रांतात जेथे हा कायदा पास झाला त्याचे अध्ययन करून गुजरातसाठी सुद्धा तसा कायदा पास करण्याची आम्ही खटपट करू.

ह्या चर्चेत श्री. रविशंकर महाराज, श्री. जुगतरामभाई दवे, श्री. बबलभाई मेहता, श्री. हरिवल्लभ परीख आणि रतिभाई गोंदिया इ. महानुभवांनी भाग घेऊन त्यांनी ग्रामदान आणि खादी ह्याबाबत मार्गदर्शन करून ह्या कार्यक्रमाला उठाव देणारे प्रभावी विचार मांडले.

---०---

www.vinoba.in

# नागाभूमीतील शांति मिशन

—जयप्रकाश नारायण

मागील अंकावरून क्रमशः

## दोन संघटना

नागालँडमध्ये आज संघटना आहेत. अेक नागा कौन्सिल आहे. ही भारताला अनुकूल आहे. आणि दुसरी संघटना फेडरल गवर्नमेन्ट ऑफ नागालँड नावाची आहे. आणि फीजो आजहि तिचा चेअरमन आहे. हे भूमिगत लोकांचे संघटन आहे. त्यांनी प्रत्येक राज्यात नागा सेना उभारली आहे. रात्री छापा मारून ते तरुणांना घेऊन जातात. त्यांना सैनिक शिक्षण देतात आणि आपला विचार हि पटवितात. आणि त्यातून त्याना कुशल विद्रोही सैनिकांचा पुरवठा होतो. परंतु ह्या दोन्ही संघटना अजून आजच्या परिस्थितीतून मार्ग काढू शकली नाही. फीजोला बोलाविण्याचा विचार आजहि काही लोक मांडतात. त्यांना वाटते काही सुधारणा झाल्या तर त्याचे मन वळेल. लोक म्हणतात ह्या जात्याच्या दोन पात्यात आमचे मात्र पीठ पडत आहे.

बहुसंख्य नागा लोकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला आहे. विदेशात जाऊन त्यांनी उच्च शिक्षण प्राप्त केले आहे. हिंदू आणि मुसलमान मात्र अजून तेथे पोहचलेच नाहीत. परंतु ख्रिस्ती मात्र तेथे गेले. ईसाई लोकांच्या मनात बैपटिस्ट चर्चबद्दल फार आदराची भावना आहे. ईसाई लोकांनी त्यांच्या भाषेत भजने बनविली, बायबलाचा अनुवाद पण केला. आमची जेथे बैठक होत असे तिचा प्रारंभ प्रार्थनेने होत असे आणि बैठकीपूर्वी आणि नंतर भजनहि म्हटले जाई. इतकेच काय बंडखोराशी चर्चा करताना प्रारंभी भजनच व्हायचे. चर्चेच्या नेत्यांची भारतासोबत राहण्याची इच्छा आहे. भारतात राहण्यातच आपले हित आहे अशी त्यांची भावना आहे. परंतु नागालँडसाठी स्वतंत्र राज्य स्थापन झाल्यावर सुद्धा सुधारणा झालेली नाही. सर्वत्र दररोज कर्फ्यू चालू असतो. सबंध नागालँडमध्ये दररोज संध्याकाळी कर्फ्यू लागू करण्यात येतो.

## शांति प्रयत्न

शांति प्रस्थापित करण्यासाठी बैपटिस्ट चर्च तर्फे नागा लोकांची एक परिषद बोलावण्यात आली होती. पाच हजार लोकांनी तींत भाग घेतला. ह्या परिषदेने घेतलेल्या निर्णयाला तेथील असेंब्लीने सर्व-संमति देऊन ठराव पास केला आणि भारत सरकारकडे तो ठराव विचारासाठी त्यांनी पाठविला. शांति-प्रस्थापित करण्यासाठी तेथील लोकांनी श्री. माइकल स्काट, श्री. जयप्रकाश नारायण, श्री. चालिया आणि श्री. शंकरराव देव ह्यांच्या सेवेची मागणी केली. त्यानंतर प्रधानमंत्र्याच्या परराष्ट्र खात्याकडून आम्हाला नागालँडमध्ये जाण्याबद्दल सूचना मिळाली. श्री. माईकेल स्कॉट आणि श्री. चालिहा साहेब विमानाने पूर्वीच कोहिमाला पोहचले होते. नंतर मीहि पण तेथे गेलो. जनरल कैन्डेथ आणि नागालँडच्या प्रतिनिधि समोर 'युद्धविरामचा' ठराव आम्ही मांडला. नागालँडच्या लोकांनी पण त्याला संमति दिली. बोलणीं जेथे होतील ते ठिकाण लष्कर मुक्त ठेवावे असे ठरले. त्यांच्यामार्फत त्यांच्या पुढाऱ्या ऐवजी सहाप्रतिनिधि सोबत चर्चा करावी असे ठरले. प्रतिनिधींच्या संरक्षणासाठी आणि संकटकाळाला तोंड देण्यासाठी त्यांच्या प्रतिनिधि सोबत तीनशे शस्त्रधारी लोक आले होते. वरील ठराव अेक अत्यंत व्यावहारिक मार्ग म्हणून त्याचा आम्ही स्वीकार केला. 'युद्धविराम' ह्या आमच्या ठरावात त्यांनी काही बदल करविले आणि त्यांनी मांडलेल्या प्रस्तावात आम्ही पण काही बदल करविले. 'युद्धविराम' करार करूनच आम्ही परतलो. श्री. विष्णू सहायजी (आसामचे गव्हर्नर) त्यावेळी म्हणाले होते की 'युद्धविराम' कराराचा भंग होऊ नये ह्याची खबरदारी घेतली जावी. त्यानंतर श्री. विष्णू सहाय हे दिल्लीला गेले. भारत सरकारने 'युद्ध विराम' करारातील मूलभूत गोष्टींना मान्यता दिली आहे.

नागा लोकांची मागणी काय आहे? त्यांच्या स्वातंत्र्याचा अर्थ कोणता आहे? मी त्यांना म्हणालो तुम्ही स्वातंत्र्याची मागणी कां करता? जसे इतर प्रांत स्वतंत्र आहेत. तेच स्वातंत्र्य तुम्हालाहि आहे. तुम्ही स्वतंत्र आहा हे त्यांना समजावून देणे दुष्कर आहे. चर्चा चालू असता 'सावरिन इन्डिपेन्डन्ट' सार्वभौम स्वतंत्रतेची गोष्ट ते पुन्ह पुन्हा करीत होते. बैठक आटोपल्यावर मी त्यांची खाजगी भेट घेऊन त्यांना त्यांच्या 'सावरीन इन्डेपेन्डन्ट'चा अर्थ विचारला. ते म्हणाले इंग्रजांच्या काळात आम्ही जसे स्वतंत्र होतो तसेच स्वातंत्र्य आम्हाला हवे आहे. आजच्या सारखी त्या काळी परिस्थिति नव्हती. हें मी त्यांना समजाविले. भूमिगत राहिल्याने मन फार संकुचित बनते, ते खुल्या वातावरणात आले तर त्यांच्या बुद्धीत पालट पडेल आणि भारतासोबत आपले संबंध कायम व्हावेत असेहि त्यांना वाटू लागेल. आता ही गोष्ट भारताच्या पार्लमेंटच्या सभासदांच्या लक्षात आली तर नागालँडचा प्रश्न त्यांना समजण्यास बरीच मदत होईल.

---•---

# प्लॅनिंग कमिशनचे सदस्य ग्रामदानी गावांना भेट देणार

ता. १ ऑगष्टला श्री. श्रीमन्नारायणजी अग्रवाल आणि ता. २ ऑगष्टला श्री. त्रिलोकसिंगजी हे प्लॅनिंग कमिशनचे दोन सदस्य ग्रामदानी गावांला भेटी देतील.

श्री. त्रिलोकसिंगजी ह्यांनी दर महिन्याला अेक भेट देण्याचे आश्वासन पूर्वी दिले होते. त्या आश्वासनाप्रमाणे त्यांची ही भेट होत आहे. त्यावेळी त्यांनी म्हसाळा ग्रामदानी गाव आपल्यासाठी निवडले होते. त्याशिवाय आणखी काही गावांची निवड प्लॅनिंग कमिशनच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याच्या दृष्टीने ते करणार आहेत.

तसे तर संबंध जिल्ह्यातील गावांकडेच विशेष लक्ष देण्याची जबाबदारी श्री. श्रीमन्नारायणजी ह्यांनी स्वीकारलेली आहे.


# अन्नधान्याची टंचाई दूर करण्यासाठी एकरी उत्पादन वाढवा

खरीप पिकांच्या कामाचा हा महत्वाचा काळ होय तेव्हां, खरीप पीक उत्पादन मोहीम यशस्वी करण्यासाठी ही कामे योग्य वेळीच करा.

**भात :** भाताच्या रोपांची ओळीत लागवड करा. बुडांतील अंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ९"×९" अथवा ९ इंच×६ इंच ठेवा. लागवडीचे वेळी एकरी ११२ पौंड सुपरफॉस्फेट व १०० पौंड अमोनियम सल्फेट ही खते द्या.

**ज्वारी :** पिकाची विरवणी करा.
भांगलणी व कोळपणी (निंदण व डवरण) करून तणांचा नाश करा.
पिकास एकरी १०० पौंड अमोनियस सल्फेट किंवा दुसरे नत्रयुक्त वरखत म्हणून द्या.

**बाजरी :** पिकाची विरवणी व जरूरीप्रमाणे भांगलणी कोळपणी करा.
पेरणीचे वेळी पिकास अमोनियम सल्फेट दिले नसल्यास कोळपणीचे वेळी एकरी १०० पौंड अमोनियम सल्फेट द्यावे.

**नागली :** रोप तयार होत असल्यास निगा राखा. तयार झालेल्या रोपाची लावणी करा. व पिकास एकरी १२५ पौंड सुपर फॉस्फेट व ५० पौंड अमोनियम सल्फेट द्या.

खरीप पिकांची योग्य ती जोपासना करा :



संपादक :-श्री. गोपाळराव काळे, श्री. बसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:-श्री. बसंतराव बोंबटकर,
मुद्रक:-गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्व:-महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग दैनिक ता. ३१-७-६४ अं.११६ र.नं.ए.न.२९५
**विनोबा वार्ता,** मगनवाडी, वर्धा (म. राज्य)
श्री. प० परंधाम आश्रम पवनार


www.vinoba.in